| | | |
|---|---|---|
| MHGO040010342019 | **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आमगांव यांच्या न्यायालयात, ता. आमगांव.**<br>(पिठासीन अधिकारी श्री ए. आर. जोशी)<br>**[ न्यायनिर्णय दि. ०५/०५/२०२६]**<br>**सं.फ़ौ.ख.क्र. ५३०/२०१९**<br>**कालावधीःव.०६,म.०६,दि.२७. नि. क्र. ३४**<br>( गुन्हा क्र. २५४/२०१९, पोलीस स्टेशन, सालेकसा ) | |
| **अभियोगपक्ष** | | **महाराष्ट्र सरकारतर्फे**<br>पोलीस स्टेशन, सालेकसा,<br>ता. सालेकसा जि. गोंदिया |
| **सहा. सरकारी वकील** | | **विधिज्ञ श्री एम. के. बोरीकर,** |
| **आरोपी** | १.<br><br><br>२.<br><br>३.<br><br><br>४.<br><br>५. | **आबिद साकुर शेख,**<br>वयः ३५ वर्षे, व्यवसाय – ड्रायव्हरी,<br>रा. वार्ड न. ०१, देवरी, जि. गोंदिया.<br>**देवेंद्र शामराव राऊत,**<br>वयः ३२ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>**उमेश देवीदयाल शाहु,**<br>वयः ३० वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>आरोपी क्र. २ व ३ रा. अंभोरा, ता. देवरी, जि. गोंदिया.<br>**अली अमिरखान हुसैन,**<br>वयः ३० वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>**खानसाहब उर्फ खन्नु आमिरखान हुसैन,**<br>वयः २५ वर्षे, व्यवसाय – मजुरी, |

| | | |
|---|---|---|
| | | आरोपी क्र. ४ व ५ रा. रिसेवाडा, ता. लांजी, जि. बालाघाट. |
| **आरोपीतर्फे वकील** | | **विधिज्ञ श्री एम. एच. गुप्ता,** |

| | |
|---|---|
| **घटना घडल्याचा दिनांक** | दि. २३.०९.२०१९. |
| **प्रथम खबर अहवाल दिनांक** | दि. २३.०९.२०१९. |
| **फिर्यादची तारीख** | दि. २३.०९.२०१९. |
| **दोषारोपपत्र दाखल झाल्याची तारीख** | दि. ०९.१०.२०१९. |
| **फिर्याद दाखल तारीख** | दि. ०९.१०.२०१९. |
| **आरोपीवर दोषारोप ठेवल्याची तारीख** | दि. ३०.०३.२०२४. |
| **पुरावा सुरू झाल्याची तारीख** | दि. १०.०९.२०२५. |
| **न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख** | -- |
| **न्यायनिर्णय तारीख** | दि. ०५.०५.२०२६. |
| **आरोपीला शिक्षा सुनावल्याची तारीख** | -- |

**<u>आरोपीची माहिती</u>**

| | |
|---|---|
| **आरोपी क्र. १ चे नाव** | आबिद साकुर शेख, |
| **आरोपी क्र. २ चे नाव** | देवेंद्र शामराव राऊत, |
| **आरोपी क्र. ३ चे नाव** | उमेश देवीदयाल शाहु, |
| **आरोपी क्र. ४ चे नाव** | अली अमिरखान हुसैन, |
| **आरोपी क्र. ५ चे नाव** | खानसाहब उर्फ खन्नु आमिरखान हुसैन, |
| **अटकेची तारीख** | -- |
| **आरोपीला जामिनावर सोडल्याची तारीख** | दि. २६.०९.२०१९. |
| **दोषारोप** | प्रा. छळ प्रति. अधि.१९६० चे कायदा ११ (डी), महा. प्राणी रक्षण |

| | |
|---|---|
| | अधि. २०१५ चे कलम ५ (अ)(२) आणि भा. द. वि. सह कलम १०९ प्रमाणे. |
| **शिक्षा देण्यात आली कि निर्दोष सोडण्यात आले** | निर्दोष सोडण्यात आले. |
| **देण्यात आलेली शिक्षा** | -- |
| **आरोपी केस दरम्यान किती दिवस तुरूंगात होता** | -- |

**<u>साक्षीदारांची यादी / बचावपक्ष / कोर्ट साक्षीदार</u>**

**अ) अभियोगपक्ष :**

| **सा. क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **साक्षीदार कोणत्या प्रकारातील आहे. (प्रत्यक्षदर्शी, पोलिस, वैद्यकिय अधिकारी, पंच)** |
|---|---|---|
| अ.सा.१ | महेश फत्तुलाल मच्छीरके, | जप्ती पंच साक्षदार (नि. क्र. २४) |

**ब) बचावपक्ष :**

| **सा. क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **साक्षीदार कोणत्या प्रकारातील आहे. (प्रत्यक्षदर्शी, पोलिस, वैद्यकिय अधिकारी, पंच, इतर)** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क) कोर्ट साक्षीदार:**

| **साक्षीदाराचे नाव** | **साक्षीदाराचे नाव** | **साक्षीदार कोणत्या प्रकारातील आहे. (प्रत्यक्षदर्शी, पोलिस, वैद्यकिय अधिकारी, पंच, इतर)** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

<u>अभियोगपक्ष/ बचावपक्ष/ कोर्ट निशाणी क्र.</u>

अ) अभियोगपक्ष

| **अ.क्र.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**ब) बचावपक्ष**

| क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क) कोर्ट**

| क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**ड) मुद्देमाल**

| क्र. | मुद्देमाल क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**न्यायनिर्णय**

**(दिनांक ०५ मे २०२६ रोजी घोषीत)**

प्रस्तुतचा खटला प्रा. छळ प्रति. अधि.१९६० चे कायदा ११ (डी), महा. प्राणी रक्षण अधि. २०१५ चे कलम ५ (अ)(२) आणि भा. द. वि. सह कलम १०९ अन्वये आरोपींविरुध्द दाखल करण्यात आला आहे.

अभियोगपक्षाचे वतीने मांडण्यात आलेली वस्तुस्थीती खालील प्रमाणे;

०२. फिर्यादी पो. हवा. खेमराज खोब्रागडे याने अशी फिर्याद दिली की, दिनांक २३.०९.२०१९ रोजी ०४:३० ते ०८:१२ वाजताचे सुमारास मौजा साखरीटोला, झालीया ता. सालेकसा जि. गोंदिया येथे आरोपी क्र. १ व आरोपी क्र. २ हे आरोपी क्र. ३ च्या ताब्यातील सहाचाकी ट्रक क्र. एम. एच. ३५–के–१२९८ मध्ये आरोपी क्र. ४ व आरोपी क्र. ५ यांच्या मालकीचे २१ नग लाल रंगाचे बैल, ०५ नग पांढरे रंगाची बैल, ०४ नग काळे पांढरे रंगाचे बैल असे एकुण ३० जनावरे प्रत्येकी किंमत ३०००/– रुपये प्रमाणे एकुण ९०,०००/– रुपयाचा माल दाटीवाटीने डाबून ठेवले व त्यांना निर्दयतेने वागणूक

देवून चारापाण्याची कोणतीही व्यवस्था न करता कत्तल करण्याकरिता अवैधरित्या नागपुर येथे वाहतुक करतांना मिळुन आले. म्हणून फिर्यादीने आरोपींविरुद्ध पोलीस स्टेशन सालेकसा येथे फिर्याद दाखल केली.

०३. फिर्यादवरुन सालेकसा पोलीस स्टेशन गु.र.क्र. २५४/२०१९ प्रा. छळ प्रति. अधि.१९६० चे कायदा ११ (डी), महा. प्राणी रक्षण अधि. २०१५ चे कलम ५ (अ) (२) आणि भा. द. वि. सह कलम १०९ अन्वये नोंदविण्यात आला व गुन्ह्याचा तपास पोलीस हवा. ज्ञानेश्वर चिरवतकर यांच्याकडे देण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी मौका जप्ती पंचनामा व साक्षीदारांची जबाब नोंदविले व तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोपत्र दाखल केले.

०४. या न्यायालयाने आरोपपत्राचे दखल घेऊन आरोपीविरूध्द प्रा. छळ प्रति. अधि.१९६० चे कायदा ११ (डी), महा. प्राणी रक्षण अधि. २०१५ चे कलम ५ (अ)(२) आणि भा. द. वि. सह कलम १०९ अन्वये नि. क्र. ११ वर निश्चित केले. आरोपीने नि. क्र. १२ ते १६ वर निवेदन करुन दोषारोप मान्य नसल्याचे कळविले आहे व संपरीक्षेची मागणी केली.

०५. अभियोगपक्षाचे व आरोपीच्यावतीने त्यांचे विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला व न्यायपटावरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता माझेपुढे खालील मुद्दे उपस्थीत होतात ते निष्कर्षासह खालीलप्रमाणे दिले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की,दिनांक २३.०९.२०१९ रोजी ०४:३० ते ०८:१२ वाजताचे सुमारास मौजा साखरीटोला, झालीया ता. सालेकसा जि. गोंदिया येथे आरोपींनी आपापसात संगनमत करुन एकुण ३० नग जनावरे प्रत्येकी किंमत ३०००/- रुपये प्रमोण | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | एकुण ९०,०००/– रुपयाचे जनावरांना दाटीवाटीने डाबून ठेवले व त्यांना निर्दयतेने वागणूक देवून चारापाण्याची कोणतीही व्यवस्था न करता कत्तल करण्याकरिता अवैधरित्या नागपुर येथे वाहतुक करतांना मिळुन आले काय ? | |
| **२.** | अंतिम आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

०६.  अभियोगपक्षाने खटल्याच्या पृष्ट्यर्थ मात्र एक साक्षीदार तपासले आहेत. जप्ती पंच सा. क्र. ०१ महेश फत्तुलाल मच्छीरके यास नि. क्र. २४ वर साक्ष नोंदविली. सदर प्रकरणामध्ये इतर साक्षदारांना समंस तामील असतांना सुद्धा ते न्यायालयात हजर झाले नाही. त्यामुळे  नि. क्र. १ वर आदेश पारीत करुन अभियोगपक्षाच्या साक्ष पुरावा बंद करण्यात आला. तसेचअभियोगपक्षाच्या साक्षीपुराव्यात आरोपीविरुद्ध काहीही आले नसल्याने, नि. क्र. १ वर आदेश पारित करुन, फौजदारी प्रकिया सहिंता चे कलम ३१३ (१)(ब) अन्वये आरोपीचे निवेदन वगळण्यात आले.

**<u>साक्षीपुरावाः–</u>**

०७.  जप्ती पंच सा. क्र. १ महेश फत्तुलाल मच्छीरके यांनी त्यांच्या सरतपासात असे कथन केले आहे की, पोलिसांनी त्यांना पंचनाम्याकरिता बोलाविले नव्हते. त्यांच्या समक्ष मौका जप्ती पंचनामा तयार करण्यात आला नाही. मौका जप्ती पंचनाम्यावर त्यांची सही आहे. परंतु, त्यातील मजकूर त्यांना माहित नाही. सदर साक्षीदार अभियोगपक्षास अनुकूल साक्ष देत नसल्याने त्यांना सरकारी वकिलांनी भारतीय पुरावा कायदा कलम १५४ अन्वये उलटतपासात प्रश्न विचारले.  मात्र त्यामध्ये कोणतीही बाब अभियोगपक्षाच्या कामी आली नाही.

**<u>मुद्दे क्र. १ करिता:</u>**

०८. एकंदरीत पुराव्याचा अवलोकन केले असता असे दिसून येते की, जप्ती पंच सा. क्र. १ महेश फत्तुलाल मच्छीरके यांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नाही. त्यामुळे जप्ती पंचनामा निसंशयरित्या सिद्ध झालेला नाही. तसेच सदर प्रकरणात अन्य साक्षदार यांना समंस तामील असतांना ते न्यायालयात हजर झाले नाही. याशिवाय अभियोगपक्षाने तपासी अधिकारी व दाखल अधिकारी यांची साक्ष नोंदविली नाही.

०९. प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपीवर दोष सिद्ध करण्याकरिता फिर्यादीची साक्ष बाधक ठरते. परंतु अभियोगपक्षाने फिर्यादीची साक्ष नोंदविली नाही. त्यामुळे फिर्याद सिद्ध झालेली नाही. तसेच तपासण्यात आलेल जप्ती पंच साक्षदाराने अभियोगपक्षास सहकार्य केले नाही. त्यामुळे अभियोगपक्ष कथन करतो त्याप्रमाणे आरोपींनी आपसात संगनमत करुन ३० नग गोवंश जातीचे जनावरांना दाटीवाटीने डाबून ठेवले व त्यांना निर्दयतेने वागणूक देवून चारापाण्याची कोणतीही व्यवस्था न करता कत्तल करण्याकरिता अवैधरित्या नागपुर येथे वाहतुक करतांना आढळुन आले ही बाब उपलब्ध पुराव्यातून सिद्ध झालेली नाही. म्हणून आरोपींना प्रस्तुत प्रकरणातून सबळ पुरावा अभावी निर्दोषमुक्त करणे न्यायोचित होईल असे माझे स्पष्ट मत आहे. प्राप्त परिस्थिती मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. २ चा निष्कर्ष नोंदवण्याकरिता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करिताः</u>–**

१०. प्राप्त परिस्थिती व मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष लक्षात घेवून मुद्दा क्र. २ चा निष्कर्ष नोंदवण्याकरिता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. आरोपी क्र. १ **आबिद साकुर शेख,** आरोपी क्र. २ **देवेंद्र शामराव**

**राऊत**, आरोपी क्र. ३ **उमेश देवीदयाल शाहु**, आरोपी क्र. ४ **अली अमिरखान हुसैन** आणि आरोपी क्र. ५ **खानसाहब उर्फ खन्नु आमिरखान हुसैन** यांनाप्रा. छळ प्रति. अधि.१९६० चे कायदा ११ (डी), महा. प्राणी रक्षण अधि. २०१५ चे कलम ५ (अ)(२) आणि भा. द. वि. सह कलम १०९ अनव्ये गुन्ह्याच्या दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता २५५ (१) प्रमाणे निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपींने फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४३७–अ अन्वयेची पुर्तता केली आहे.

३. जप्त मुद्देमाल म्हणजे, ३० नग गौवंश जातिचे जनावरे यांचा ताबा अपील कालावधीनंतर मुळ मालकास कायम करण्यात येतो.

४. जप्त मुद्देमाल म्हणजे, सहाचाकी ट्रक क्र. एम. एच. ३५–के–१२९८ यांचा ताबा मुळ मालकास सुपुर्दनाम्यावर देण्यात आला असून त्यांचा ताबा अपिल कालावधीनंतर कायम करण्यात येतो.

५. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by JOSHI ATUL RATNAKAR
Date: 2026.05.05 15:16:43 +0530

[ ए. आर. जोशी ]

दिनांक : ०५.०५.२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आमगांव.